जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

3 APR 2026

सकाळ

# विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी साकारले 'पक्ष्यांसाठी पाणवठे'

कोल्हापूर, ता. २ : कागल येथील जैवविविधता उद्यानात शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागामधील विद्यार्थ्यांनी पक्ष्यांसाठी दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले. किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनीच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत येथील सार्थ एज्युकेशन सोसायटीतर्फे कागल येथे जैवविविधता उद्यान पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम सुरू आहे. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप माळी यांनी असा उपक्रम हाती घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले होते. वृक्षप्रेमी संस्थेचे अमोल बुढ्ढे, हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. जयसिंग कांबळे, प्रकाश निकम, अक्षय भोसले, संशोधक, यांनी श्रमदानात सहभाग घेतला.

03 APR 2026

पुढारी

# रणरणत्या उन्हात पक्ष्यांची तहान भागणार

## शिवाजी विद्यापीठातर्फे कागल जैवविविधता उद्यानात कृत्रिम पाणवठे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वाढत्या उन्हाळ्यामुळे पशुपक्ष्यांची पाण्यासाठी होणारी वणवण थांबवण्यासाठी कागल येथील जैवविविधता उद्यानात शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागातर्फे दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार करण्यात आले आहेत.

किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनीच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत आणि सार्थ एज्युकेशन सोसायटीच्या मार्गदर्शनाखाली कागल येथे जैवविविधता उद्यान पुनरुज्जीवन प्रकल्प राबवला जात आहे. या प्रकल्पांतर्गत पक्ष्यांसाठी पाण्याची सोय करण्याचे आवाहन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप माळी यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत हिंदी अधिविभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी श्रमदानातून हे पाणवठे साकारले.



**कोल्हापूर : कागलच्या जैवविविधता उद्यानात श्रमदानातून तयार केलेल्या पक्षीतीर्थ. सोबत डॉ. तृप्ती करेकट्टी व अन्य.**

वृक्षप्रेमी संस्थेचे अमोल बुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम पूर्ण झाले. यावेळी बुद्धे यांनी पक्ष्यांसाठी कृत्रिम घरट्यांचे वाटप करून त्यांचे महत्त्व विशद केले. डॉ. दिलीप माळी यांनी उद्यानाच्या पुनरुज्जीवनाचा उद्देश, भविष्यातील नियोजन आणि जैवविविधतेची गरज यावर प्रकाश टाकला.

उपक्रमात डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम, डॉ. अक्षय भोसले यांच्यासह संशोधक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला. अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले.

माणदेशी बुलंद आवाज...
दैनिक
# माणदेश एक्सप्रेस
• शुक्रवार दि ३ एप्रिल २०२६ •

# राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तृतीय



**कोल्हापूर : हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (नवी. दिल्ली) यांच्या वतीने हैदराबाद येथे झालेल्या आठव्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

हैदराबाद येथील मौलाना आझाद राष्ट्रीय ऊर्दू विद्यापीठात १ व २ एप्रिल २०२६ या कालावधीत राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा २०२५-२६ पार पडली. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा एकूण १५ सदस्यांचा संघ सहभागी झाला. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सईद ऐनुल हसन यांच्या हस्ते तृतीय क्रमांकासाठीचा चषक आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

या संघात अभय विजय हावळ, मुनाफ रियाज अहमद खान, सूरज महादेव कांबळे, स्नेहल सत्येंद्रकुमार चव्हाण, किरण सूर्यकांत भाकरे, तनुजा रावसाहेब कांबळे, मृण्मयी सदाशिव पांचाळ, सुधांशू गौतम तांबे, विपश्यना भिकाजी कामत आणि निहाल अलनिसार रुकडीकर यांचा समावेश होता. संघाचे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ऋषिकेश देशमाने आणि सुमंत कुलकर्णी यांनी काम पाहिले. संघासोबत वादक साथीदार म्हणून देशमाने यांच्यासह कौस्तुभ शिंदे, प्रेम भोसले यांनी काम केले. संघव्यवस्थापक म्हणून चिखली येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाचे देवेंद्र श्रीमंत शिंदे आणि महिला संघ व्यवस्थापक म्हणून विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या अधीक्षक सुरेखा आडके यांनी काम पाहिले.

विजेत्या संघाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे यांनी अभिनंदन केले आहे.

0 3 APR 2026 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तृतीय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (नवी दिल्ली) तर्फे हैदराबाद येथे झालेल्या आठव्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

हैदराबाद येथील मौलाना आझाद राष्ट्रीय ऊर्दू विद्यापीठात राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा झाली. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा एकूण १५ सदस्यांचा संघ सहभागी झाला. त्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सईद ऐनुल हसन यांच्या हस्ते तृतीय क्रमांकासाठीचा चषक आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. या संघात अभय हावळ, मुनाफ अहमद खान, सूरज कांबळे, स्नेहल चव्हाण, किरण भाकरे, तनुजा कांबळे, मृण्मयी पांचाळ, सुधांशू तांबे, विपश्यना कामत आणि निहाल रुकडीकर यांचा समावेश होता. तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून ऋषिकेश देशमाने आणि सुमंत कुलकर्णी यांनी काम पाहिले. वादक साथीदार म्हणून देशमाने यांच्यासह कौस्तुभ शिंदे, प्रेम भोसले यांनी काम केले. संघव्यवस्थापक देवेंद्र शिंदे आणि महिला संघ व्यवस्थापक म्हणून सुरेखा आडके यांनी काम पाहिले.




हैदराबाद येथील राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने कव्वालीचे सादरीकरण केले.

0 3 APR 2026

लोकमत

# महाराष्ट्रात प्रथमच कनोईंग, कयाकिंगची राष्ट्रीय स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ५ एप्रिल ते ८ एप्रिल या कालावधीत सांगली येथे कृष्णा नदीमध्ये कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. या स्पर्धा महाराष्ट्रात प्रथमच आयोजित केल्या आहेत.

सांगली येथील वसंतदादा पाटील स्मृती स्मारक कृष्णा नदी घाट येथील रॉयल बोट क्लब येथे या स्पर्धा होतील. या स्पर्धेत ४० विद्यापीठांमधून ६८५ खेळाडू सहभागी होतील. स्पर्धेचे उद्घाटन ५ एप्रिल रोजी सकाळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

03 APR 2026
सकाळ



नवी दिल्ली : शिवाजी विद्यापीठाला युजीसीकडून निधी मिळण्याबाबतचे निवेदन खासदार धनंजय महाडिक यांनी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना दिले.

# 'युजीसी'ने विद्यापीठाला तातडीने निधी द्यावा

## महाडिक यांचे केंद्रीय मंत्री प्रधान यांना निवेदन

कोल्हापूर, ता. २ : 'शिवाजी विद्यापीठाला केंद्र सरकारच्या विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (युजीसी) विविध योजनांसाठी निधी मंजूर झाला. मात्र, त्यापैकी सुमारे ५० कोटी रुपयांचा निधी अद्याप प्रत्यक्षात विद्यापीठाकडे वर्ग झालेला नाही. संबंधित निधी तातडीने विद्यापीठाला मिळावा', अशी मागणी खासदार धनंजय महाडिक यांनी केली.

याबाबत खासदार महाडिक यांनी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना निवेदन दिले. विद्यापीठातील नावीन्यपूर्ण योजनेसाठी मंजूर झालेल्या निधीपैकी सुमारे ५७ लाख १४ हजार रुपयांचा निधी येणे बाकी आहे. वैयक्तिक संशोधन प्रकल्पांसाठी सुमारे १३ लाख १२ हजार रुपये, हिंदी विभागाच्या विविध कामांसाठी २५ लाख ३२ हजार रुपये, तर विविध विभागांच्या अध्यासनांसाठी सुमारे तीन कोटी रुपयांचा निधी येणे आवश्यक आहे. याशिवाय विद्यापीठाच्या अकराव्या योजनेतील सुमारे सहा कोटी ४२ लाख रुपये येणे बाकी आहे. बाराव्या योजनेंतर्गत विद्यापीठाला ९ कोटी ५७ लाख रुपये येणे गरजेचे आहे. याशिवाय अन्य काही योजनांसाठी मंजूर झालेल्या निधीतील काही रक्कम विद्यापीठाकडे आली असली, तरी बरीच रक्कम येणे बाकी आहे. याबाबत विद्यापीठाने विनंती केल्यानुसार मी केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू केला आहे. त्याला केंद्रीय मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती खासदार महाडिक यांनी दिली.

0 3 APR 2026 तरूण भारत जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकारात्मक

## शिवाजी विद्यापीठास शासनाकडून नऊ कोटींच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता प्राप्त

# `यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल'ची इमारत होणार हायटेक

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटची इमारत आता आणखी हायटेक होणार आहे. इमरातीच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी महाराष्ट्र शासनाकडून सुमारे नऊ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. लवकरच याच्या बांधकामास सुरूवात होणार आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रयत्नांतून हा निधी प्राप्त झाला आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटची इमारत.**

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सन २०११–१२ मध्ये विद्यापीठास यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट हा विभाग महाराष्ट्र शासनाकडून मंजूर झाला. सदर योजनेअंर्तगत इमारतीचा तळमजला बांधण्यासाठी १० कोटी रुपयांचे अनुदान शासनाकडून प्राप्त झाले. सदर अनुदानातून शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तळमजल्याचे काम पूर्ण झाले. या इमारतीचे उद्घाटन सप्टेंबर २०२५ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते.

त्यावेळी मंत्री पाटील यांनी या इमारतीच्या पहिल्या मजल्यासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार शासन निर्णय क्रमांक बांधकाम–२०२६/ई–१५९३४८५/विशि–२ दि.२५ मार्च २०२६ अन्वये ९ कोटी १९ लाख ४४ हजार ८२० रुपये इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. यामध्ये पहिल्या मजल्याचे अंदाजित २२,०५९ चौरस फूट इतके बांधकाम प्रस्तावित आहे.

सदर अनुदान मंजूर होण्यासाठी मंत्री पाटील यांच्यासह विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी पाठपुरावा केला. तसेच, राज्याचा सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्यापीठाचा अभियांत्रिकी विभाग, महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग आणि संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग (पुणे) यांनीही प्रयत्न केले.

### भुयारी मार्गासाठी साडेआठ कोटी रुपये

**यापूर्वी विद्यापीठास मंत्री पाटील यांच्या पाठपुराव्याने शासनाकडून फेब्रुवारी २०२३ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरुपी जोडणाऱ्या भुयारी मार्गाच्या कामासाठी सुमारे साडेआठ कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. हे काम वर्षभराच्या अवधीत पूर्ण होऊन भुयारी मार्ग वापरातही आला आहे.**

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस
• शुक्रवार दि ३ एप्रिल २०२६ •

# यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटसाठी शासनाकडून ९ कोटींच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** येथील शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी महाराष्ट्र शासनाकडून सुमारे ९ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या प्रयत्नांतून हा निधी प्राप्त झाला आहे.




शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सन २०११-१२ मध्ये विद्यापीठास यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट हा विभाग महाराष्ट्र शासनाकडून मंजूर झाला. सदर योजनेअंतर्गत इमारतीचा तळमजला बांधण्यासाठी १० कोटी रुपयांचे अनुदान शासनाकडून प्राप्त झाले. सदर अनुदानातून शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तळमजल्याचे काम पूर्ण झाले. या इमारतीचे उद्घाटन सप्टेंबर २०२५ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी या इमारतीच्या पहिल्या मजल्यासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार शासन निर्णय क्रमांक बांधका-२०२६/ई-१५९३४८५/विशि-२ दि.२५ मार्च २०२६ अन्वये ९ कोटी १९ लाख ४४ हजार ८२० रुपये इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. यामध्ये पहिल्या मजल्याचे अंदाजित २२,०५९ चौरस फुट इतके बांधकाम प्रस्तावित आहे.

सदर अनुदान मंजूर होण्यासाठी मंत्री श्री. पाटील यांच्यासह विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच, राज्याचा सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्यापीठाचा अभियांत्रिकी विभाग, महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग आणि संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग (पुणे) यांनीही प्रयत्न केले.

यापूर्वी विद्यापीठास मंत्री श्री. पाटील यांच्याच पाठपुराव्याने शासनाकडून फेब्रुवारी २०२३ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरुपी जोडणाऱ्या भुयारी मार्गाच्या कामासाठी सुमारे साडेआठ कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. हे काम वर्षभराच्या अवधीत पूर्ण होऊन भुयारी मार्ग वापरातही आला आहे.

0 3 APR 2026

सकाळ

# विद्यापीठ 'ऑनलाईन एमबीए' प्रवेशास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला १० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे ऑनलाईन एम. बी. ए. अभ्यासक्रम गेल्या वर्षापासून सुरू आहे. हा अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालापर्यंत प्रक्रिया ही ऑनलाईन स्वरुपाची आहे.

03 APR 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मुदतवाढ

## • १० एप्रिलपर्यंत अर्ज भरण्याचे आवाहन

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग व ए.आय.सी. टी. ई. मान्यता प्राप्त ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जानेवारी-फेब्रुवारी २०२६ सत्रासाठी प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत, अशी माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या



निकष एकचा दर्जा असणारे शिवाजी विद्यापीठ ऑनलाइन अभ्यासक्रम सुरु करून बदलत्या जगातील आव्हानांना विद्यार्थी समर्थपणे समोर जावा याकरिता एक ऐतिहासिक पाऊल टाकत आहे.

आता घर बसल्या मोबाईल, संगणकद्वारे जागतिक दर्जाचा ऑनलाइन एम.बी.ए.अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सुवर्ण संधी दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र इच्छुकांना देत आहे. सुसज्ज अशा लर्निंग मेनेजमेंट सिस्टीमद्वारें विषय तज्ज्ञांनी विकसित व्हिडिओ लेक्चर्स, इ-बुक्स लाईव्ह कॉन्सालिंगसेशन, डिस्कशन फोरम, प्रक्टीस टेस्टच्या माध्यमातून संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून रोजगाराची संधी मिळणार आहे. इच्छुकांनी प्रवेश अर्ज विद्यापीठ संकेतस्थळ यावर करणे आवश्यक आहे. तरी https://online.unishivaji.ac.in/admissions/ येथे प्रवेश अर्ज १० एप्रिलपर्यंत भरावा असे आवाहन संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले आहे.

0 3 APR 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तृतीय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (नवी दिल्ली) यांच्यावतीने हैदराबाद येथे झालेल्या ८ व्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

हैदराबाद येथील मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठात १ व २ एप्रिल २०२६ या कालावधीत राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा २०२५-२६ पार पडली. स्पर्धेत विद्यापीठाचा १५ सदस्यांचा संघ सहभागी झाला. त्यांना कुलगुरू डॉ. सईद ऐनुल हसन यांच्या हस्ते चषक देऊन गौरविण्यात आले.



**कोल्हापूर : हैदराबाद येथे झालेल्या राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ.** **(छाया : पप्पू अत्तार)**

संघाचे मार्गदर्शक म्हणून ऋषीकेश देशमाने व सुमंत कुलकर्णी यांनी काम पाहिले. संघासोबत वादक साथीदार म्हणून देशमाने यांच्यासह कौस्तुभ शिंदे, प्रेम भोसले यांनी काम केले. संघव्यवस्थापक म्हणून देवेंद्र शिंदे व महिला संघ व्यवस्थापक म्हणून विद्यार्थी विकास विभागाच्या अधीक्षक सुरेखा आडके यांनी काम पाहिले.

विजेत्या संघाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे यांनी अभिनंदन केले.

03 APR 2026

तरूण भारत

# केंद्राने उर्वरित ५० कोटी विद्यापीठाला त्वरित द्यावेत

## खा. महाडिक यांची केंद्रीय मंत्री प्रधान यांच्याकडे मागणी

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** केंद्र सरकारकडून मंजूर असलेल्या निधीतील उर्वरित सुमारे ५० कोटी रूपये शिवाजी विद्यापीठाला तातडीने मिळावेत, अशी मागणी गुरूवारी खासदार धनंजय महाडिक यांनी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

खासदार महाडिक यांनी नवी दिल्लीत केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची नुकतीच भेट घेतली. कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाला केंद्राच्या विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विविध योजनांसाठी निधी मंजूर झाला आहे. मात्र त्यापैकी सुमारे ५० कोटींचा निधी, प्रत्यक्ष विद्यापीठांकडे वर्ग झालेला नाही. विद्यापीठातील नाविन्यपूर्ण योजनेसाठी मंजूर झालेल्या निधीपैकी सुमारे ५७ लाख १४ हजार रुपयांचा निधी येणे बाकी आहे. वैयक्तिक संशोधन प्रकल्पांसाठी सुमारे १३ लाख १२ हजार रुपयांचा निधी येणे गरजेचे



**कोल्हापूर : नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना मागणीचे निवेदन देताना खासदार धनंजय महाडीक.**

आहे. याबाबत शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या पत्रानुसार खासदार महाडिक यांनी केंद्राकडे पाठपुरावा सुरू केला आहे. विद्यापीठाला मंजूर झालेल्या निधीतील थकीत सुमारे ५० कोटी रुपये तातडीने मिळावेत, अशी मागणी मंत्री प्रधान यांच्याकडे केली आहे. याला मंत्री प्रधान यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती खासदार महाडिक यांनी दिली.

नवराष्ट्र
Kolhapur | 03 April 2026 | Page 2

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## देशभरातील ४० विद्यापीठांमधील ६८५ क्रीडापटूंचा असणार सहभाग

# आंतरविद्यापीठ कनोइंग-कयाकिंग




▶ सांगली, (वा.) भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ५ ते ८ एप्रिल या कालावधीत सांगली येथे कृष्णा नदीमध्ये या स्पर्धा होतील. ही स्पर्धा महाराष्ट्रात प्रथमच आयोजित केल्या जात असून त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आयोजित ऑनलाइन पत्रकार परिषदेमध्ये दिली.

कुलगुरू डॉ. गोसावी म्हणाले, सांगली येथील 'कै. वसंतदादा पाटील स्मृती स्मारक कृष्णा नदी घाट' येथील रॉयल बोट क्लब येथे होणार आहेत. या स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होतील. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील नौकानयनातील उदयोन्मुख खेळाडू व क्रीडाप्रेमी यांना ही स्पर्धा पाहण्याची मोठी संधी प्राप्त झाली असून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागाचा अनुभव व वातावरण निर्मितीच्या दृष्टीने विद्यापीठाच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

## स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ ८ एप्रिल रोजी

क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे म्हणाले, स्पर्धेचे उद्घाटन रविवार, ५ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता सांगली येथील कै. वसंतदादा पाटील स्मारक कृष्णा नदी घाट येथे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे हे उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ ८ एप्रिल रोजी सायंकाळी चार वाजता होणार असून यामध्ये यशस्वी खेळाडूंना मेडल व सांघिक विजेता, उपविजेता व तृतीय क्रमांक यांना चषक देऊन गौरवण्यात येणार आहे. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी संचालक डॉ. कबीर खराडे, उपकुलसचिव विलास सोयम उपस्थित होते.

03 APR 2026

पुढारी

# पर्यावरण नियमांचे उल्लंघन; विद्यापीठाकडून कार्यवाही सुरू

## कुलसचिवांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नोटिसीनंतर प्रशासनाने तत्काळ बैठक घेतली. उपाययोजनांसह कार्यवाही करण्यास सुरुवात झाली आहे.

सांडपाणी प्रक्रियेचा अपुरा प्रकल्प, त्याचे अशास्त्रीय साठवण यासह पर्यावरण नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाने बुधवारी शिवाजी विद्यापीठाला कारणे दाखवा नोटीस बजावली. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने तातडीने गुरुवारी बैठक घेतली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे



यांच्यासह प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. बैठकीत १२ मार्च रोजी झालेल्या सुनावणीनुसार विद्यापीठाकडून कार्यवाही सुरू झाली आहे. आगामी काळात विद्यापीठात पर्यावरणासंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन यासह विविध उपाययोजन करण्याचे बैठकीत ठरले. परंतु, विद्यापीठास अद्याप महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नोटीस प्राप्त झाली नसल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समजते.

0 3 APR 2026 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लक्षवेधी महाराष्ट्रात प्रथमच सांगलीतील कृष्णा नदीत होणार स्पर्धा : देशभरातील ४० विद्यापीठांचा सहभाग

# अभा आंतरविद्यापीठ कनोईंग, कयाकिंग स्पर्धा

त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर : भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ५ ते ८ एप्रिल या कालावधीत सांगली येथे कृष्णा नदीमध्ये या स्पर्धा होतील. या स्पर्धा महाराष्ट्रात प्रथमच आयोजित केल्या जात असून त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी पत्रकार परिषदेस ऑनलाईन संबोधित करताना दिली. कुलगुरू डॉ. गोसावी यांनी दिलेल्या माहितीनुसार, "ही स्पर्धा सांगली येथील "कै. वसंत दादा पाटील स्मृती स्मारक कृष्णा नदी घाट" येथील रॉयल बोट क्लब येथे होणार आहे.



राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागाचा अनुभव व वातावरण निर्मितीच्या दृष्टीने विद्यापीठाच्या वतीने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी सांगितले की, स्पर्धेचे उद्‌घाटन रविवार ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सांगली येथील कै. वसंतदादा पाटील स्मारक कृष्णा नदी घाट येथ उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे हे उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर सन्माननीय अतिथी म्हणून सांगलीचे जिल्हाधिकारी मैनक घोष, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त सत्यम गांधी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सांगलीचे आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, सांगलीचे महापौर धीरज सूर्यवंशी आणि स्पर्धा निरीक्षक यांचीही यावेळी उपस्थिती असेल. प्रत्यक्ष स्पर्धा ५ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता सुरू होतील. स्पर्धेत कयाकिंग मध्ये के -१, के -२, के- ४ तसेच कनोईंगमध्ये सी -१, सी- २ असे २०० मी. ५०० मी. व १००० मी. या जलक्रीडा प्रकारात स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ ८ एप्रिल रोजी सायंकाळी चार वाजता होणार असून यामध्ये यशस्वी खेळाडूंना मेडल व सांघिक विजेता, उपविजेता व तृतीय क्रमांक यांना चषक देऊन गौरवण्यात येणार आहे.

या स्पर्धेचा लाभ सांगली सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी, खेळाडू यांनी घ्यावा, असे आवाहनही डॉ. बनसोडे यांनी केले आहे.

### उदयोन्मुख खेळाडूंना संधी

**एकूण ६८५ पुरूष, महिला खेळाडूंचा सहभाग**

**या स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होतील. खेळाडू प्रशिक्षक व पंच यांची निवास व्यवस्था मिशन हॉस्पिटल मिरज येथील विद्यार्थी वसतीगृहामध्ये केली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पंचांची निवास व्यवस्था मिशन हॉस्पिटलच्या गेस्ट हाऊस येथे करण्यात आली आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील नौकानयनातील उदयोन्मुख खेळाडू व क्रीडाप्रेमी यांना सदर स्पर्धा पाहण्याची मोठी संधी प्राप्त झाली आहे.**

### नौकानयन

- भारतीय विद्यापीठे महासंघ आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजन
- ५ ते ८ एप्रिल कालावधीत होणार स्पर्धा

03 APR 2026

पुढारी

### शिवाजी विद्यापीठ कुलगुरू पद

# मुंबईत आजपासून पात्र उमेदवारांच्या मुलाखती

- देशभरातून २० ते २५ जण शर्यतीत
- निवड समितीसमोर सादरीकरण



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदाची निवड प्रक्रिया सुरू असून, अर्ज छाननीतून पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या ३ व ४ एप्रिल रोजी मुंबईत कुलगुरू शोध निवड समिती समोर मुलाखती होणार आहेत. कुलगुरू पदासाठी देशभरातून सुमारे २० ते २५ जण शर्यतीत आहेत.

तत्कालीन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा पाच वर्षांचा कार्यकाल ६ ऑक्टोबर २०२५ रोजी पूर्ण झाला. त्यानंतर कुलगुरू निवड समिती तीन सदस्यांपैकी एकाच सदस्याची निवड करण्यात आली. पुण्याच्या सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे सध्या शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा प्रभारी कार्यभार आहे. कुलपती कार्यालयाने राबविलेल्या अर्ज प्रक्रियेत कुलगुरू पदासाठी राज्यभरातून ११५ जणांचे अर्ज आले. अर्जांची छाननी होऊन २० ते २५ पात्र उमेदवारांची यादी तयार झाली आहे.

यात शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र- कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. होमीभाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, एसएनडीटी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. चव्हाण, वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाचे डॉ. श्रीकृष्ण महाजन, पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे, पुणे विद्यापीठातील डॉ. संजय ढोले, दिल्ली विद्यापीठातील डॉ. विलास खरात यांच्यासह डॉ. राजेंद्र देशमुख, डॉ. सतीश पाटील, डॉ. नितीन देसाई, डॉ. विजय खरे, डॉ. स्मिता देशमुख, डॉ. राजेश गच्चे, राजेंद्र काकडे यांचा समावेश आहे.

03 APR 2026
पुण्यनगरी



# कुलगुरू निवडीसाठी आजपासून मुलाखती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, पात्र उमेदवारांच्या मुलाखती दि. ३ व ४ एप्रिल रोजी मुंबईत होणार आहेत. राज्यभरातून आलेल्या ११५ अर्जांच्या छाननीनंतर शोध समितीने २० ते २५ उमेदवारांची संक्षिप्त यादी तयार केली आहे. माजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कार्यकाळ ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी संपल्यापासून हे पद रिक्त आहे. शोध समितीसमोर होणाऱ्या या मुलाखतींत शिवाजी विद्यापीठातील प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. आर. के. कामत, डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी तज्ज्ञांचा समावेश आहे. विशेषतः डॉ. जाधव आणि डॉ. कामत यांची नावे चर्चेत आघाडीवर आहेत. या मुलाखतींमधून समिती पाच नावे निश्चित करून राज्यपालांकडे पाठवेल. राज्यपाल या पाच जणांतून एकाची अंतिम निवड करतील.

0 3 APR 2026
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# कुलगुरुपदासाठी आजपासून २५ उमेदवारांच्या मुलाखती

## मुंबईत होणार प्रक्रिया; शोध समितीकडून छाननी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी २५ उमेदवारांच्या मुलाखती उद्या, शुक्रवारी आणि शनिवारी (ता. ४) मुंबई येथे होणार आहेत. कुलगुरू शोध समितीने प्राथमिक छाननी प्रक्रियेनंतर या उमेदवारांची निवड केली असून, अंतिम फेरीसाठी यापैकी पाच उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे.

कुलगुरुपदासाठी यापूर्वी सुमारे ११५ इच्छुकांनी अर्ज सादर केले होते. त्यानंतर ९ व १० फेब्रुवारी रोजी झालेल्या छाननीत उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, संशोधन कार्य, तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान यांचा सखोल आढावा घेण्यात आला. या प्रक्रियेनंतर २५ उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड निश्चित करण्यात आली.



### अंतिम मुलाखतीसाठी ५ जणांची निवड होणार

■ या २५ उमेदवारांमधून पाच जणांची नावे निश्चित करून ती राज्यपालांकडे सादर करण्यात येतील. त्यानंतर कुलगुरुपदासाठी अंतिम निवड-मुलाखतीची प्रक्रिया होणार आहे.

त्यात होमीभाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, माजी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, माजी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एस. एस. चव्हाण, आर. जी. सोनकवडे, श्रीकृष्ण महाजन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. संजय ढोले, संजय चाकणे, दिल्लीतील डॉ. विलास खरात, एनआयटीमधील राजेंद्र काकडे यांच्यासह डॉ. राजेंद्र देशमुख, डॉ. जोगी, सतीश पाटील, ए. एम. महाजन, एस. एस. कोळेकर, नितीन देसाई, विजय खरे, स्मिता देशमुख, उद्धव भोसले, राजेश गच्चे आदींचा समावेश आहे. त्यातील काही उमेदवारांच्या शुक्रवारी, तर काहींच्या शनिवारी मुलाखती होणार आहेत.